# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दि.06/07/2017 रोजी (का.प.क्र.03) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

गुरूवार दिनांक 06/07/2017 रोजी (का.प.क्र.03) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.10 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग (अति.आयुक्त),नगर सचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
07. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
08. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
09. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
10. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
11. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
12. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
13. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
14. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

श्री.राजगौरव वानखेडे :महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणुन नव्याने रूजू झालेले अधिकारी यांनी आपला परिचय सभागृहाला द्यावा.
(याचवेळी स.सदस्या श्रीमती किर्ती शिंदे या मा.सभापतींच्या डायस समोर जमीनीवर बसतात.)

मा.सभापती : परिचय देण्यात यावा.

मा.अतिरिक्त आयुक्त : (मा.श्री.श्रीकृष्ण भालसिंग सभागृहाला आपला परिचय देतात) अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर दिनांक 03.07.2017 पासून रूजू झालेलो आहे.

मा.सभापती :स.सदस्या श्रीमती किर्ती शिंदे यांनी आपल्या जागेवर बसुन चर्चा करावी.

श्रीमती किर्ती शिंदे :मी जागेवर बसणार नाही माझ्या तीन मागण्या मंजूर झालेल्या नाहीत, कनिष्ठ अभियंत्यांची मागणी केली होती, तर वार्ड अभियंत्याची बदली करण्यात आलेली आहे. माझा वार्ड झोन नंबर 9 मध्ये बदली करण्यात यावा. माझे वार्डातील कामकाज झोन 9 मध्ये ठेवण्यात यावे.

मा.सभापती :अभियंत्याच्या मागणीबाबत माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त (म) :प्रत्येक वार्डमध्येच शाखा अभियंत्याची कमी आहे. कंत्राट बेसवर अभियंते घेणार आहोत,त्यामधुन निश्चित अभियंते देण्यात येईल. स.सदस्या यांचे समवेत चर्चा झालेली आहे. ठराव झाल्यावर आठ दिवसांमध्ये अभियंता देण्यात येईल.

श्रीमती किर्ती शिंदे :नागरीक वार्डामध्ये टॅक्स भरण्यासाठी जात नाही कारण त्या ठिकाणी पार्किंगसाठी जागा नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :माझ्या वार्डात अभियंत्याची गरज आहे. काही विभागांमध्ये अभियंत्यांची आवश्यकता नसतांना त्या ठिकाण्ी कार्यरत आहे.

मा.सभापती :स.सदस्या श्रीमती किर्ती शिंदे यांचे वार्डात अभियंत्याची व्यवस्था करण्यात यावी. झोन चेंज करण्याबाबत मा.महापौरांकडे यासंबधी बैठक आयोजित करण्यात येईल.

श्रीमती किर्ती शिंदे :निरालाबाजार ते मनपा मुख्यालय हा रस्ता गेल्या दहावर्षापासून तयार केलेला नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :चार वेळेस टेंडर कॉल केलेले आहे परंतु प्रतिसाद मिळत नाही. सदरील रस्त्याचे काम 100 कोटीमध्ये घेतलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :हरकत आहे, 100 कोटीच्या रस्त्याची यादी फायनल झाली आहे का? खुलासा करण्यात यावा.

श्रीमती किर्ती शिदे :आदर्श रोडमध्ये हा रस्ता येतो, पाहणी करण्यात यावी तो पर्यंत मी जागेवर बसणार नाही, रस्त्याची जबाबदारी कोण घेणार खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :झोनचा विषय हा पॉलिसी मॅटर आहे. मा.महापौरांसमवेत यासंबधी बैठक लावण्यात येईल. निश्चितपणे प्रश्न मार्गी लावण्यात येईल. 8 दिवसात रस्त्याचा प्रश्न मार्गी लागेल. स.सदस्या श्रीमती किर्ती शिंदे यांनी जागेवर बसून घ्यावे.

श्रीमती किर्ती शिंदे :जो पर्यंत रस्त्याचे उद्‌घाटन होत नाही, तो पर्यंत उभे राहुनच बोलणार आहे.

मा.सभापती :टेंडरची सर्व प्रक्रीया आपल्याला माहिती आहे आपण जेष्ठतम नगरसेवक आहात.

श्रीमती संगीता वाघुले :महिला नगरसेविकांचे कामे होत नाही. महिला नगरसेविकांचे कामे गंभिरतेने प्रशासन घेत नाही.

मा.सभापती :चार वेळेस टेंडर कॉल झालेले आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही.

श्रीमती मनिषा मुंडे :स.सदस्यांच्या मताशी सहमत आहे.

(स.सदस्या श्रीमती किर्ती शिंदे मा.सभापती यांच्या डायससमोर खाली जमीनीवर बसलेल्या असतात)

श्री.सिताराम सुरे :माझ्या वार्डात सहा महिने झालेले आहे वर्क ऑर्डर होवुनही, परंतु अद्यापही काम सुरू झालेले नाही. वारंवार संबधीत सिद्दीकी नावाच्या कंत्राटदाराला संपर्क साधला आहे. वार्ड अभियंता यांनीही संबधीतास सांगीतलेले आहे. वार्डात काळी माती आहे. चालता येत नाही. वारंवार तेच तेच रस्ते केले जातात परंतु आमच्या वार्डातील रस्ते केले जात नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

वार्ड अभियंता :नोटीस दिलेली आहे, समक्ष संपर्क साधलेला आहे परंतु पेमेंट बाकी असल्यामुळे पेमेंट मिळाल्याशिवाय काम चालू करणार नाही. असे कंत्राटदाराचे म्हणने आहे. या कामाशी निगडीत बील पेंडींग नाही, इतर कामाचे बील पेंडींग आहेत.

श्रीमती संगीता वाघुले :काम होत नसेल तर पत्र देण्यात यावे, अब्राहम नगरचे टेंडर होवुन सहा महिणे झालेले आहे परंतु काम झालेले नाही.

मा.सभापती :पहाणी करून प्रश्न मार्गी लावण्यात यावे.

श्रीमती मनिषा मुंडे :50 वर्ष महानगरपालिकेला झालेले आहे. 100 कोटी रूपये रस्त्यांसाठी अनुदान आलेले आहे, मा.आमदार श्री.अतुलजी सावे, मा.भागवत कराड, मा.तनवाणी, शहराचे मा.महापौर श्री.भगवान घडमोडे, मा.सभापती श्री.गजानन बारवाल, गटनेता श्री.प्रमोद राठोड यांचे सहकार्याने हा निधी प्राप्त झालेला आहे.

श्री.सय्यद मतीन :मा.आमदार इम्तियाज जलील यांचाही यामध्ये सहभाग आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्वपक्षीय लोकप्रतीनिधींचा सहभाग होता,सगळयाच पक्षाच्या लोकप्रतिनिधीनी काम केलेले आहे, सर्व लोकप्रतिनिधींची आणि शासनाचे अभिनंदनाचा ठराव पारीत करावा, अशी विनंती करण्यात येते.

मा.सभापती :स.सदस्यानी जो ठराव मांडलेला आहे तो पारित करण्यात येतो, सर्व मा.आमदार, मा.खासदार सर्व लोकप्रतिनिधी, मा.महापौर यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येते, याबाबतची सर्व प्रक्रीया ही तातडीने करण्यात यावी. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष ज्यांनी ज्यांनी यासाठी मदत केलेली आहे, त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.सय्यद मतीन :विद्यापीठ गेट ते रोषनगेट, महानगरपालिका कार्यालय या रस्त्याचा 100 कोटींच्या रस्त्यामध्ये समावेश करण्यात यावा.

मा.सभापती :सर्वांच्या भावना लक्षात घेवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. स.सदस्या किर्ती शिंदे यांनी खुर्चीवर बसावे.

श्रीमती किर्ती शिंदे :रोडची पाहणी करण्यासाठी यावे, रस्ता किती महिण्यात तयार करण्यात येईल याची माहिती द्यावी.

मा.सभापती :याबाबतची सर्व कार्यवाही प्रशासनाने तातडीने करण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :जोपर्यंत काम होत नाही तो पर्यंत बाजुला उभे राहील.

मा.सभापती :सर्व सभागृह आपल्या बाजुने आहे आपण बसुन घ्यावे.

श्री.सिताराम सुरे :आतापर्यंत ज्या भागामध्ये रस्ते झालेले नाही, त्या भागातील रस्त्यांचा समावेश करण्यात यावा. माझ्या वार्डातील डिपी रस्त्यांचे भुसंपादन करण्याचे बाकी आहे. 100 कोटीच्या रस्त्यामध्ये 32 मीटर डिपी रस्ता सर्वे नं 35, 36 जळगांव रस्त्याचा 15 मीटरचा समावेश करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :24 कोटी रूपयाचा निधी ज्या वेळेस आला होता त्या वेळेस शहरातील 05 रस्ते आदर्श रस्ते करण्याचे प्रयत्न केला होता. काही प्रमाणात त्यात यश जरी आले असले तरी ज्या मुदतीत पुर्ण होणे अपेक्षित होते त्या वेळेत पुर्ण झालेले नाही. एकत्रित कंत्राट काढुन जीएनआय या कंपनीस कंत्राट दिले होते. यासाठी पीएमसी नेमण्यात आली होती परंतु त्यानंतर तत्कालीन आयुक्तांचे आणि पीएमसीचे वाद झाले आणि त्या भागामधील कामे रेंगाळलेली आहे. आजपर्यंत काम पुर्ण केलेले नाही. सर्व लोकप्रतिनिधी शासनाकडुन निधी आणण्याचा प्रयत्न करीत आहे. शासन सकारात्मकरित्या पाठींबा देत आहे. 100 कोटी रस्त्यांच्यासाठी ज्या रस्त्यांची गरज आहे त्या रस्त्याचा समावेश करण्यात यावा. यादी करतांना सर्वसमावेशक यादी असावी असा सर्व सभागृहाची भावना आहे. एकत्रित टेंडर कृपया करण्यात येवु नये. वर्कवाईझ टेंडर करण्यात यावे. प्रत्येक रस्त्यांचे टेंडर वेगळे काढण्यात यावे. मागचा अनुभव पाहता 24 कोटींच्या रस्त्यांचे काम एका कंत्राटदाराला दिले त्याने ते काम बिघडवले आहे.

स्वतंत्ररित्या वर्क वाईझ निवीदा काढण्यात याव्या. यामध्ये मुख्य काम हे काम करून घेणाऱ्याचे असते, त्यासाठी पीएमसी नियुक्त करतो, मागच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार या कामासाठी पीएमसी नियुक्त केलेली आहे. त्या पीएमसीकडे टेक्निकल स्टाफ नाही. कर्मचाऱ्यांचा पीएफ भरणा केलेली नाही. निवीदेसाठी जी कागदपत्रे सादर केलेली आहे ती माझ्याकडे आहेत. सदर पीएमसीने जे 22 कर्मचारी नियुक्त केलेले आहे. पहिले सहा कर्मचारी टेक्निकल आहे,परंतु आता ते काम करीत नसल्याचे कळालेले आहे. श्री.पटोल यांचे दोन ठिकाणी नाव नमुद आहे 11 व 15 क्रमांकावर नांव नमुद आहे. परळी नगर परिषदेमध्ये 7.5 टक्के above ने काम घेतलेले आहे. तीन वर्षानंतर महानगरपालिकेत तेच काम 1.10 टक्केने घेतलेले आहे. सर्वसाधारणपणे तीन वर्षानंतर महागाई वाढते. रस्त्याची यादी करण्यापासून गोंधळ आहे. परळी नगरपरिषदेमध्ये काम केलेले आहे तेथील मुख्यघ्याकारी यांचे पत्र आहे. चुकीच्या पध्दतीने काम केलेले आहे निष्कृष्ट दर्जाचे काम केलेले असतांना वारंवार तक्रारी असतांना जगप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर कंन्स्ट्रक्शन लिमीटेड या एजन्सीला वारंवार सांगुन काम केलेले नाही या पत्राची प्रत मी मा.सभापतीकडे सादर करीत आहे. ही बाब मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणुन द्यावी. 100 कोटी रूपयांच्या रस्त्यांची वाट लागू नाही. सदरील पैसा सर्वसामान्य जनतेचा पैसा आहे. याची अशा पध्दतीने वाट लावु नये अशी विनंती करतो. टेंडर भरतांना सदरील एजन्सीने अनुभवाबाबत गेवराई येथील प्रमाणपत्र लावलेले आहे. ठराव झाल्यानंतर कुठल्याही प्रकारचे काम झालेले नाही. शासनाची दिशाभुल करून सदरील एजन्सी काम करते. अशा एजन्सीच्या हाती काम देवुन रस्त्यांची वाट लावायची आहे का? 100 कोटी रस्त्यांसाठी टेक्निकली योग्य अशा पीएमसीची नियुक्ती करावी. यापुढे रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी नव्याने पीएमसी नियुक्ती करावी. जगप्रयाग या कंपणीचे काम ताबडतोब थांबविण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्या यांनी उपस्थिती केलेल्या मुद्यांबाबत वस्तुस्थितीबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :दिशाभुल करण्यात येत आहे. एकही टेक्निकल स्टाफ त्यांचेकडे नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेत जेपी कंन्स्ट्रक्शन म्हणुन काम केलेले आहे, त्याचेवर पीएमसी म्हणुन काम केलेले आहे. चार वर्षापुर्वी काम केलेले असतांना संबधीताचे एक रूपयाही पेमेंट केलेले नाही. तत्कालिन शहर अभियंता यांनी पुर्ण पेमेंट थांबवलेले आहे. याचे कारण काय?

शहर अभियंता :टेंडर प्रोसेसमध्ये lowest आल्या कारणाने टेंडर recommend करण्यात आले आहे. ब्लॅकलीस्ट झाले असेल तर कारवाई करता येईल. स.सदस्यांनी सांगीतल्यानुसार व्यवस्थित काम करत नाही. टेंडरमध्ये दोन भाग आहेत. प्री टेंडरींग वर्क आणि पोस्ट टेंडरींग वर्क कामामध्ये काही त्रुटी राहत आहे. त्यांचे काम आपण रद्द करू शकतो, पोस्ट टेंडरींगमध्ये घेता येत नाही. त्यावेळेस नविन टेंडर काढण्यात येईल.

मा.सभापती :या सर्व प्रकरणाची चौकशी करावी. सदरील एजन्सी व्यवस्थित काम करीत नसेल तर त्या एजन्सीकडुन काम काढण्यात यावे. चौकशी केल्यानंतर पुढील

सर्व कार्यवाही करावी. पीएमसीमुळे समस्या येत असेल तर ती बदलण्यात येईल. चौकशी करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :पुढील बैठकीत याबाबतची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह माहिती सादर करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :मागच्या बैठकीत भुमिगत या विषयावर सविस्तर चर्चा केलेली आहे. वर्तमानपत्रमध्ये आयआयटी, पवई कडुन थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करून घेणार आहे हे सत्य आहे का?

कार्यकारी अभियंता :ॲडिशनल थर्ड पार्टी तपासणीसाठी पत्र दिलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :शासकीय अभियांत्रिकी कडुन ऑडीट चालू आहे का?

कार्यकारी अभियंता :नियमित ऑडिट चालू आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :यासंबधीचा अहवाल स्थायी समितीसमोर ठेवणे आवश्यक आहे. त्यांच्या सूचनांचे प्रशासनाने पालन केलेले आहे का?

कार्यकारी अभियंता :सूचनांचे पालन केलेले आहे आणि रेग्युलर त्यांचे सूचनांचे पालन करण्यात येते.

श्री.राजगौरव वानखेडे :50 टक्के काम सुरू झाल्यावर ऑडीट सुरू केलेले आहे.

कार्यकारी अभियंता :वर्क ऑर्डरपासून संबधीतांशी पत्र व्यवहार केलेला आहे. चर्चेसाठी किमान चार महिने लागलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सन 2014 ते 2016, चार महिने चर्चेसाठी गेलेले आहे. दिड वर्ष शिल्लक होते. 34 लाख 56 हजार रूपये देण्यात आलेले आहे याची मा.सर्वसाधारण सभेची/मा.स्थायी समिती सभेची मंजूरी घेतलेली आहे का?

कार्यकारी अभियंता :सदरची बाब तपासून माहिती देण्यात येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :संबधीत अधिका-यांना भूमिगत योजनेचेच एकच काम दिलेले आहे.

मा.सभापती :मा.स्थायी समितीची मान्यता घेतलेली आहे का?

कार्यकारी अभियंता :मा.स्थायी समितीची मान्यता घेतल्याचे आठवत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :चेंजेस केल्याची माहिती कोणत्याही सभागृहाला नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :शासकीय अभियांत्रिकीने कोणत्या सूचना केलेल्या आहेत, त्रुटी काढलेल्या आहेत त्या समोर येणे आवश्यक आहे. त्यानंतर प्रशासनाने त्या सूचनांवर कोणती ॲक्शन घेतली हे समोर येणे आवश्यक आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :थर्ड पार्टी इन्सेपेक्शन हा वेगळा भाग आहे. सदरील योजना 100 टक्के Failuar होणार आहे, याची जबाबदारी, निश्चिती कुणावर धरायची.

मा.सभापती :संबधीत कंपणीवर केव्हाही कार्यवाही करू शकतो.

श्री.रेणुकादास वैद्य :टेक्निकल, Financial ऑडीट सभागृहासमोर ठेवण्यात यावे. त्यानंतर या विषयावर चर्चा करण्यात येईल.

मा.सभापती :सविस्तर माहिती सभागृहासमोर ठेवण्यात यावी. पाईपचे टेस्ट रिपोर्ट सादर करण्यात यावे.

श्री.सय्यद मतीन :खोदकाम केल्यानंतर महानगरपालिका मुख्यालय समोरील रस्ता दुरूस्त केला आहे, परंतु पट्टी तशीच आहे. पुर्ण रस्ता करणे आवश्यक होते.

कार्यकारी अभियंता :जेवढा पोर्शन खोदकाम केलेले आहे तेवढा रस्ता तयार करून देण्यासंबधी तरतुद आहे. अतिरिक्त काम करण्यासंदर्भात सभागृहाची सूचना असल्यास ती कार्यवाही करण्यात येईल.

| | |
|---|---|
| श्री.सय्यद मतीन | :असिफिया कॉलनीतील काम केव्हा करणार आहेत, खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | :काम सुरू करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी. |
| श्री.अजीम अहेमद | :दमडीमहल येथे खोदकाम केलेले आहे तो रस्ता दुरूस्त केलेला नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :रस्ता खोदकाम करण्यासाठी 45 कोटी रूपये ठेवलेले आहे, त्यातील खर्च किती झाला आहे. |
| कार्यकारी अभियंता | :त्यामध्ये सेव्हिंग झालेली आहे. |
| श्री.सिताराम सुरे | :वार्डातील रस्ते खोदुन ठेवलेले आहे. |
| श्री.अजीम अहेमद | :ज्या ज्या ठिकाणी कामे केलेले आहे, त्या ठिकाणी जाऊन पाहणी करण्यात यावी, वस्तुस्थिती लक्षात येईल. |
| श्री.सय्यद मतीन | :पुढील बैठकीपर्यंत सर्व कामे झाली पाहिजे असे आदेश देण्यात यावे. |
| मा.सभापती | :सर्व रस्त्यांचे कामे चालू करण्यात यावे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :सन 2010 मध्ये सिव्हरेज टॅक्स नागरीकांडून गोळा करत आहे. त्या मध्ये किती पैसा जमा झालेला आहे. |
| कार्यकारी अभियंता | :टॅक्स विभागाकडून माहिती घेतलेली आहे. 42 कोटी रूपये जमा झालेले आहे. हा महानगरपालिकेचा हिस्सा टाकण्यासाठी नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :तत्कालिन शहर अभियंता यांनी सांगीतले होते की, आपला जो हिस्सा द्यावयाचा आहे तो सिव्हरेज टॅक्समधून दयावयाचा आहे. असे त्यावेळेस त्या बैठकीत आहे. त्या इतिवृत्ताची कॉपी सादर करू शकतो. |
| कार्यकारी अभियंता | :अमृत योजनेच्या गाईडलाईनमध्ये आहे. मेंन्टनन्सच्या कामासाठी आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :सिव्हरेज टॅक्स हा भूमिगतसाठीच वसूल केला होता. 42 कोटी जमा झालेले आहे 20 कोटी रूपये थकीत आहे. 30 जून पर्यंत काम करणे आवश्यक होते, पुढे चार महिने मुदतवाढ का दिली? याचे कारण दिले की महानगरपालिकेचे फंड उपलब्ध नसल्यामुळे त्यावेळेस काम पुर्ण झाले नाही म्हणुन चार महिने मुदतवाढ दिली आहे. सिव्हरेज टॅक्सचे वेगळे खाते करण्यात येईल म्हणून सांगण्यात आले होते. |
| कार्यकारी अभियंता | :त्यावेळेस लेखाधिकारी यांना विनंती केली होती, लेखा विभागाला पत्र दिलेले आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :42 कोटी रूपये वेगळया कामासाठी वापरण्यात आले आहे. ही प्रशासनाची चूक आहे. कोणतीच योजना महानगरपालिकेत सक्सेस झालेली नाही. येणा-या बैठकीत माहिती देण्यात यावी. |
| मा.सभापती | :येणाऱ्या बैठकीत फायनान्शीअल, टेक्निकल ऑडीटची सविस्तर माहिती देण्यात यावी. |
| श्री.सोहेल शेख | :मागील बैठकीत सांगण्यात आले होते की, एनओसी आल्यावर काम चालू होईल, मी स्वतः एनओसी आणलेली आहे ती मी आपणाकडे सादर करतो. काम चालू करण्यात यावे. |
| मा.सभापती | :काम चालू करण्यात यावे. |
| कार्यकारी अभियंता | :PWD ची जागा आहे, त्यांचीही एनओसी आवश्यक आहे. |
| मा.सभापती | :तात्काळ समस्या सोडविण्यात यावी. |
| श्रीमती मनिषा मुंडे | :मागील दोन वर्षापासून समस्या मांडत आहे. तेथील परिस्थिती गंभिर आहे. |
| मा.सभापती | :याबाबतीत प्रशासनाला आदेश दिलेले आहे. शहर अभियंता, वार्ड अभियंता यांना सूचना करण्यांत येते की, सदर काम तात्काळ सुरू करण्यात यावे. सर्व पाहणी केलेली आहे. |

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :मागच्या बैठकीत पर्यटन कक्षाच्या कर्मचा-यांच्या पेमेंटबाबत चर्चा केली होती, त्याच प्रमाणे वर्ग तीन कर्मचा-यांचे तीन तीन महिन्यांपासून पेमेंट नाही. मागील बैठकीत पर्यटन कक्षाच्या कर्मचाऱ्यांचे पेमेंट तात्काळ करण्यासंबधी आदेश दिले होते, त्यांच्या पुढे सेवा घ्यायची किंवा नाही, हा नंतरचा भाग आहे. |
| मा.सभापती | :मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार खुलासा करण्यात यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :पर्यटनाच्या विद्‌यार्थ्यांचे पगार करणे आवश्यक आहे,टेक्निकल काही अडचण असल्यास आजच्या स्थायी समिती सभेमध्ये कर्मचा-यांना घेण्यासंबधी प्रस्ताव आहे. त्यामध्ये यांचा समावेश करण्यात यावा व त्यांचा पगार करण्यात यावा. |
| मा.सभापती | :केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती द्यावी. |
| उपआयुक्त (म) | :वेतनाबाबतीत निश्चित धोरण ठरविलेले नाही. प्रस्तावामध्ये ठेवलेले आहे, आज प्रस्ताव मान्य झाल्यावर कार्यवाही करण्यात येईल आणि विभागीय पर्यटन अधिकारी यांनी पत्र दिलेले आहे. कर्मचा-यासहीत हॅन्डओव्हर करण्यासंदर्भात आहे. कर्मचाऱ्यांच्या पेमेंटसहीत सर्व कार्यवाही करणार आहे. तसेच आत्तापर्यंतचे पेमेंट संदर्भात मंजूरीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| मा.सभापती | :पर्यटन विभागाच्या कर्मचाऱ्यांचे पेमेंट कोण करणार आहेत. |
| उपआयुक्त (म) | :आत्तापर्यंतचे पेमेंट महानगरपालिका करणार आहे, आजच्या बैठकीत विषय आहे, विषय मंजूर झाल्यावर आठ दिवसात कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :किती दिवसात पेमेंट करणार? |
| उपआयुक्त (म) | :आठ ते दहा दिवसात पेमेंट संबधी कार्यवाही करण्यात येईल. |
| मा.सभापती | :ॲन्टीचेंबरमध्ये यासंबधी बैठक घेवुन पेमेंटच्या सूचना दिलेल्या आहेत. तरी पेमेंटची तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :सन 2022 पर्यंत सर्वांना घरे देण्यासंबधी मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे स्वप्न आहे, प्रधानमंत्री आवास योजना सुरू झाल्यापासून किती अर्ज भरून घेतलेले आहे व त्याची आजची स्थिती काय आहे. आत्तापर्यंत झालेल्या प्रक्रियेबाबत माहिती देण्यात यावी. |
| शहर अभियंता | :जवळपास 80 हजार फॉर्म आठ महिन्यापुर्वी आलेले आहेत. त्यासाठी एजन्सी फिक्स केलेली आहे. जीओ ट्रकींग करायचे आहे, सर्वे करायचा आहे. त्यानंतर आराखडा तयार करायचा डिपीआर तयार करायचा आहे तो शासनाकडे मान्यतेसाठी पाठवायचा आहे. स्थायी समितीने तीन ते चार महिन्यापुर्वी एजन्सीला मान्यता दिलेली आहे. आर्क असोसिएटस् यांना टेंडर दिलेले आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :आजच्या वर्तमानपत्रामध्ये आर्क असोसिएटस् आणि सीमा असोसिएटस् यांना ब्लॅकलीस्ट केलेले आहे. |
| शहर अभियंता | :ब्लॅकलीस्ट करण्यात आलेले नाही. रमाई आवास योजना वेगळी आहे. समाजकल्याण विभागाची योजना आहे. प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये बीपीएल आणि एपीएल या दोघांचाही समावेश आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :प्रोसेस पुर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे. |
| शहर अभियंता | :साधारणतः 30 ते 40 दिवसांचा कालावधी लागणार आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :सन 2022 पर्यंत सर्वांना घरे दयावयाची आहेत. त्यामुळे तातडीने सर्व कार्यवाही पार पाडावी. योजना सर्व सामान्य नागरीकांपर्यंत पोहचविण्यात याव्यात तातडीने सर्व कामे मार्गी लावण्यात यावीत. |

मा.सभापती :प्रशासनाने यासंबधी जातीने लक्ष घालुन सर्व कार्यवाही पार पाडावी.

श्रीमती संगीता वाघुले :प्रधानमंत्री आवास योजनेचे अर्ज सर्व स्विकारलेले आहे का? यासंबधीची यादी सर्व स.सदस्यांना माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता :80 हजार अर्ज आलेले आहेत,त्याची तपासणी होवुन सर्व कार्यवाही पार पाडली जाणार आहे,सर्व सदस्यांना यादी माहितीस्तव दाखविली जाणार आहे.

मा.सभापती :याबाबतची यादी प्रकाशित करून सर्व स.सदस्यांना माहिती देण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :62 कर्मचाऱ्यांच्या अनाधिकृत नियुक्तीबाबत मुद्दा मांडला होता. त्यावर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली.

उपआयुक्त (म) :62 कर्मचाऱ्याबाबत संबधीतास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती त्याचे उत्तर आलेले आहे. जानेवारी 2015-16 मध्ये जी स्थायी समितीची बैठक झालेली होती, त्यामध्ये सध्या कार्यरत आहे आणि आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी घेणे संदर्भात मान्यता झालेली आहे. यांत्रिकी विभागाकडुन 62 अतिरिक्त कर्मचा-यांची मागणी करण्यात आली होती आणि तातडीने ते पुरविण्यात आलेले आहे. कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव होता, मा.आयुक्तांकडे संचिका पाठविण्यात आलेली आहे. मा.आयुक्तांनी सांगीतल्याप्रमाणे 62 कर्मचाऱ्यांची स्थायी समितीची मान्यता घेतलेली आहे पुन्हा प्रस्ताव तयार करून स्थायी समितीच्या मान्यतेकरीता ठेवणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मा.आयुक्तांची मान्यता घेण्यात आली होती का?

उपआयुक्त (म) :मा.आयुक्तांची मान्यता घेण्यात आली नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :नियमान्वये कार्यवाही झालेली नाही. मा.स्थायी समितीने दिलेल्या सूचनांचे पालन होत नसेल तर प्रश्न विचारायचे की नाही विचारायचे?

मा.सभापती :मा.स्थायी समितीने दिलेल्या आदेशाचे पालन प्रशासनाने करावे,अशी सूचना करण्यात येते.

**विषय क्र. 14 :** (विषय क्र.02 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि.15/06/2017 (का.प.क्र.02) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे.)

दि.02/06/2016 (का.प.क्र.01), दि.22/06/2016 (का.प.क्र.02), दि.02/07/2016 (का.प.क्र.03), दि.04/08/2016 (का.प.क्र.04), दि.23/08/2016 (का.प.क्र.05), दि.26/08/2016 (का.प.क्र.05 दि.23/08/16 ची तहकूब), दि.27/09/2016 (का.प.क्र.06), दि.26/10/2016 (का.प.क्र.07), दि.11/11/2016 (का.प.क्र.07 दि.26/10/16 ची तहकूब), दि.24/11/2016 (का.प.क्र.08), दि.28/12/2016 (का.प.क्र.09), दि.16/01/2017 (का.प.क्र.10), दि.30/01/2017 (का.प.क्र.11), दि.17/02/2017 (का.प.क्र.12), दि.28/02/2017 (का.प.क्र.13), दि.10/03/2017 (का.प.क्र.13 दि.28/02/17 ची तहकूब), दि.21/03/2017 (का.प.क्र.14), दि.07/04/2017 (का.प.क्र.15) व दि.21/04/2017 (का.प.क्र.14 दि.21/03/17 ची तहकूब) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

टिप : वरील इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.

मा.सभापती :विषय क्रमांक 14 इतिवृत्त.

श्री.सिताराम सुरे :दिनांक 07.04.2017 रोजी ऐनवेळचे अनेक विषय यामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. कंप्रेसिव्ह पध्दतीने लाईट दुरूस्त करण्यासंदर्भाने 22 एजन्सी होत्या, माझ्या वार्डात अनेक दिवसापासून लाईट बंद आहेत, श्री.के.डी.देशमुख यांना वारंवार सांगीतले आहे. परंतु काम होत नाही, संबधीत गुत्तेदार काम करीत नाही. गुत्तेदाराकडून काम होत नसल्यास त्याच्याविरूध्द कारवाई करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :गुत्तेदाराचा टाईम पिरेड संपल्यावर टाईम पिरेड संपेपर्यंत पुन्हा निवीदा करत नाही. ही एक मोठी अडचण आहे. निवीदा पीरेड संपण्यापुर्वीच निवीदा काढली पाहीजे. पुर्न निवीदा तातडीने करण्यात यावी, कार्यकारी अभियंता यांचेकडे विद्युत विभागाचा चार्ज देण्यात यावा.

मा.सभापती :मुदतवाढ दिलेली आहे का? स्थायी समितीची मंजूरी आहे का?

उपअभियंता (विद्युत) :मुदतवाढ दिलेली आहे. स्थायी समितीची मंजूरी आहे. 31 मार्च पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

मा.सभापती :स.सदस्यांच्या व नागरीकांच्या तक्रारी संबधीत अधिकारी यांचेविरूध्द वाढलेल्या आहेत. आठ दिवसात सर्व समस्या निराकरण न झाल्यास संबधीत अधिकारी यांची बदली करण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे :संबधीत गुत्तेदार यांना ताकीद देण्यात यावी.

श्रीमती संगीता वाघुले :ऐनवेळचे विषय सर्व स.सदस्यांना अवगत करण्यात यावे व त्यावर चर्चा झाली पाहिजे.

मा.सभापती :सभेपुढे विषय आल्याशिवाय मंजूर होणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :विषय क्रमांक 191 मध्ये ब्लॅकलीस्ट रद्य करा म्हणुन विषय मंजूर करण्यात आला. तो ऐनवेळचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. संबधीताच्या लेटरपॅडवर ब्लॅकलीस्ट रद्य करा म्हणुन प्रस्ताव ठेवण्यात आला. ही अतिशय गंभिर बाब आहे. अशा पध्दतीने कामकाज चालू असेल तर विचार करण्याची वेळ आहे. विषय क्रमांक 191 रद्य करण्यात यावा. भविष्यातही सदरील कंत्राटदार ब्लॅकलीस्ट रहावा.

मा.सभापती :महानगरपालिकेतील काम करत असलेल्या ठेकेदारांना अपील करण्याचा अधिकार आहे. त्याचेवर झालेल्या निर्णयाची योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रस्ताव प्रशासनाने ठेवायला पाहिजे किंवा स.सदस्यांनी नियमानुसार ठेवला पाहिजे.

श्रीमती संगीता वाघुले :कंत्राटदाराला ब्लॅकलीस्ट ठेवण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :एवढे इतिवृत्त राहणे योग्य नाही, जे हरकतीचे मुद्ये आहे ते सोडुन बाकी इतिवृत्त मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती :विषय क्रमांक 191 रद्द करण्यात येतो, दिनांक 02.06.2016 ते 21.04.2017 संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त दुरूस्तीसह विषय मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

दि.02/06/2016 (का.प.क्र.01), दि.22/06/2016 (का.प.क्र.02), दि.02/07/2016 (का.प.क्र.03), दि.04/08/2016 (का.प.क्र.04), दि.23/08/2016 (का.प.क्र.05), दि.26/08/2016 (का.प.क्र.05 दि.23/08/16 ची तहकूब), दि.27/09/2016 (का.प.क्र.06), दि.26/10/2016 (का.प.क्र.07), दि.11/11/2016 (का.प.क्र.07 दि.26/10/16 ची तहकूब), दि.24/11/2016 (का.प.क्र.08), दि.28/12/2016 (का.प.क्र.09), दि.16/01/2017 (का.प.क्र.10), दि.30/01/2017 (का.प.क्र.11), दि.17/02/2017 (का.प.क्र.12), दि.28/02/2017 (का.प.क्र.13), दि.10/03/2017 (का.प.क्र.13 दि.28/02/17 ची तहकूब), दि.21/03/2017 (का.प.क्र.14) तसेच दि.07/04/2017 (का.प.क्र.15) मधील ठराव क्र.191 रद्द करण्यात येतो, या दुरूस्तीसह व दि.21/04/2017 (का.प.क्र.14 दि.21/03/17 ची तहकूब) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. 15 :** (विषय क्र.07 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि.15/06/2017 (का.प.क्र.02) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे.)

विषय :"टॅक्टर लोडर्स (06 नग) पुरवठा करणे" या कामासाठी ठेकेदार मे.महालक्ष्मी ॲग्रो एजन्सीज, कन्नड यांचेकडून प्रति नग रू.1321000/- दराने 06 ट्रॅक्टर्स लोडर्स खरेदीसाठी रू.7926000/- रकमेची निविदा स्विकृत करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : महाटेंडर्स आय.डी.क्र.-2016-AMCA-165234-3

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - (वार्ड 1,2,3 व 8) |
| 2. | कामाचे स्वरुप | ट्रॅक्टर लोडर्स (06 नग) पुरवठा करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, एकुण रूपये 55339622/- रकमेच्या पूर्वगणनपत्रास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.686 दिनांक 13/10/2016 अन्वये मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | मंजुर पुर्वगणपत्रकापैकी रूपये 8535000/- रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले आहे. |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | (www.mahatenders.gov.in) प्रसिध्दीचा दिनांक 04/01/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.16/01/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.20/02/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेद्दाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रूपये | टक्केवारी |
| 1 | मे. महालक्ष्मी ॲग्रो एजन्सीज कन्नड | 7926000/- | 609000/- कमी | 7.14% कमी |
| 2 | मे.रत्नप्रभा ॲटो एजन्सीज औरंगाबाद | 8394042/- | 141000/- कमी | 1.65% कमी |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | पथदिवे नवीनीकरण व त्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही. |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.महालक्ष्मी ॲग्रो एजन्सीज कन्नड यांचेकडून निविदा रक्कम रूपये 8535000/- पेक्षा रूपये 609000/- ने कमी म्हणजेच रक्कम रूपये 7926000/- मध्ये करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

मा.सभापती : दि.01/07/2017 पासून शासनाने 6% व्हॅट ऐवजी 12% जी.एस.टी. लागू केलेला आहे, सदर एजन्सीने नविन कर प्रणालीनुसार मान्यता मिळावी म्हणुन विनंती केलेली आहे, दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टॅक्टर लोडर्स (06 नग) पुरवठा करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.महालक्ष्मी अॅग्रो एजन्सीज, कन्नड यांचेकडून निविदा रक्कम रूपये 8535000/- पेक्षा रूपये 609000/- ने कमी म्हणजेच रक्कम रूपये 7926000/- मध्ये करण्यास व करार करण्यास तसेच दि.01/07/2017 पासून शासनाने 6% व्हॅट ऐवजी 12% जी.एस.टी. लागू केलेला असल्यामुळे व सदर एजन्सीने नविन कर प्रणालीनुसार मान्यता मिळावी म्हणुन विनंती केलेली असल्याने त्यासही दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 16 : (नगर सचिव विभाग)**

दिनांक 03/06/2017 (का.प.क्र.01) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त कायम करणे.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : विषय क्र. 16 मंजूर. |

**ठराव :**

दिनांक 03/06/2017 (का.प.क्र.01) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. 17 : (उपअभियंता झोन क्र.9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.09 कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.66,70,71,102,103 व 104 अंतर्गत मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे मान्सुनपूर्व पॅचवर्क व दुरूस्ती करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.49,91,660/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2017-18 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात रस्ते दुरूस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता, प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.49,91,660/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : विषय क्रमांक 17 |
| श्री.रेणुकादास वैद्य | : अंदाजपत्रक आहे, मंजूरीस हरकत नाही. 6 वार्डात खड्डे पडलेले आहे इतर वार्डात खड्डे नाही का? |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| शहर अभियंता | :पुर्ण वार्डचे दिलेले आहेत. झोन नं 1 ते 9. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :प्रस्तावामध्ये सहा वार्डाचा उल्लेख आहे. |
| शहर अभियंता | :अंदाजपत्रक तीन ते चार महिण्यापुर्वी दाखल करण्यात आलेले आहेत आणि सर्व वार्ड घेतलेले आहेत. टप्प्या टप्प्याने पॅचवर्कचे अंदाजपत्रक सभेसमोर येणार आहे. |
| मा.सभापती | :विषय क्रमांक 17 ते 20 मंजूर. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.09 कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.66,70,71,102,103 व 104 अंतर्गत मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे मान्सुनपूर्व पॅचवर्क व दुरूस्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.49,91,660/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 18 : (कार्य.अभियंता पा.पु.)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, जिन्सी मुख्य रस्त्यालगत असलेल्या भागात शहागंज व जिन्सी जलकुंभावरून पाणी पुरवठा करणाऱ्या 300 मी.मी. व्यासाची व 250 मी.मी. व्यासाची डी.आय. आणि 100 मी.मी. व्यासाची व 150 मी.मी. व्यासाची आर.सी.सी. या मुख्य व

वितरण वाहिन्या आहेत. जिन्सी खासगेट ते जिन्सी चौक दरम्यान मुख्य रस्त्याच्या रूंदीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. वरील सर्व जलवाहिन्यांद्वारे जिन्सी, नवाबपुरा, भवानीनगर व लगतच्या परिसरात पाणी पुरवठा करण्यात येतो. वितरण वाहिन्या या रस्त्याच्या दक्षिण बाजूस असून सद्यस्थितीत मुख्य रस्त्यात बाधीत होत आहेत.

रूंदीकरणापूर्वी रस्त्याची रूंदी कमी असल्याने छेद जोडण्या व झडपा या रस्त्याच्या मध्यभागी आलेल्या आहेत. तसेच एकच मुख्य वितरण वाहिनी नसल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी व्यथ देखील होतो. या सर्व बाबींचा विचार करता व भविष्यात जलवाहिनीच्या देखभाल दुरूस्तीकरीता रस्ता खोदावा लागू नये याकरीता रस्त्याच्या दोन्ही बाजूने नवीन जलवाहीनी टाकणे गरजेचे आहे. त्यामुळे जुन्या जलवाहीन्या बदलण्याकरीता 500,300,200,150 व 100 मी.मी. व्यासाच्या डी.आय.के.-7 जलवाहिन्या टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 43,01,990/- इतकी आहे. करीता अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिन्सी खासगेट ते जिन्सी चौक दरम्यान मुख्य रस्त्याच्या रूंदीकरणाचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे, रस्त्याच्या दोन्ही बाजूने जुन्या जलवाहीन्या बदलून नविन 500,300,200,150 व 100 मी.मी. व्यासाच्या डी.आय.के.-7 जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 43,01,990/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 19 : (प्र.शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.63 अविष्कार कॉलनी अंतर्गत साईनगर येथील रस्त्याचे ट्रिमिक्स कॉक्रीटीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुची (DSR) नुसार तयार करण्यात आले असून सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.28,99,999/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दि.24/04/2017 रोजी मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.28,99,999/- चा प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.63 अविष्कार कॉलनी अंतर्गत साईनगर येथील रस्त्याचे ट्रिमिक्स कॉक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.28,99,999/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 20 : (शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.97,98,99,112,113 येथील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांचे पावसाळ्यापूर्वी डांबरी पॅचवर्क करणे बाबत या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रूपये 4995103/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.16/05/2017 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील रस्ते दुरूस्ती पॅचवर्क वार्ड क्र.07 पृष्ठ क्र.37 मध्ये अ.क्र.02 वर तरतुद उपलब्ध आहे. करिता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.4995103/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.97,98,99,112,113 येथील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांचे पावसाळ्यापूर्वी डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 4995103/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 21 : (कार्यकारी अभियंता 4,5,6,7 व 9)**

विषय : औरंगाबाद शहराअंतर्गत शासनाकडून अपेक्षित असलेल्या अनुदान रक्कम रू.5.00 कोटीच्या प्रस्तावित स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने औरंगाबाद येथे स्मृतीवन व स्मारक उभारण्याच्या कामाकरीता शशी प्रभु अँड असो. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन प्रकल्प रक्कमेच्या (Project Cost) 5.00% दराचे निविदेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-2017-AMCA-208901-2 सन 2017-18
AMC/EE/ (4,5,6,7 & 9) /2017/199 दि.26/04/2017.

महोदय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (4,5,6,7 व 9) |
| 2. | कामाचे स्वरुप | शासनाकडून अपेक्षित असलेल्या अनुदान रक्कम रू.5.00 कोटी मधून प्रस्तावित स्मृतीवन व स्मारक उभारण्याच्या कामा अंतर्गत निविदापूर्व व निविदानंतरच्या कामाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्ती करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | लागू नाही. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | निरंक |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई- टेंडर विभाग पत्र जा.क./मनपा/ई-निविदा 683/2017, दिनांक 06/03/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक 04/05/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक 06/05/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 (तीन) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ. क्र. | ठेकेद्दाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | शासकीय प्राप्त अनुदानानुसार प्रकल्प रक्कमेवर टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | शशी प्रभु अँड असोसिएटस् | शासनाकडून अपेक्षित असलेल्या अनुदान रक्कम रू.5.00 कोटीमधून प्रस्तावित. | 5.0% Project Cost |
| 2 | आर्क अँड असोसिएटस् (Arc & Asso.) | शासनाकडून अपेक्षित असलेल्या अनुदान रक्कम रू.5.00 कोटीमधून प्रस्तावित. | 4.32% of Project Cost + Service Tax |
| 3 | मुकेश शर्मा अँड असोसिएटस | शासनाकडून अपेक्षित असलेल्या अनुदान रक्कम रू.5.00 कोटीमधून प्रस्तावित. | 5.50% of Project Cost + Service Tax 15% Extra |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निरंक |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | शासनाकडून अपेक्षित असलेल्या अनुदान रक्कम रू.5.00 कोटीमधून प्रस्तावित. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | निरंक |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | लागू नाही |
| | तरी शासनाकडून अपेक्षित असलेल्या अनुदान रक्कम रू.5.00 कोटीमधून प्रस्तावित स्मृतीवन व स्मारक उभारण्याच्या कामाअंतर्गत निविदापूर्व व निविदानंतरची कामे तसेच सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे इत्यादी करीता शशी प्रभु अँड असो यांची सर्वात कमी दराची व प्रकल्प रक्कमेच्या 5.00 टक्के दराची निविदा मा.स्थायी समितीची मान्यता घेणेबाबत सादर. दरम्यान या प्रस्तावित स्मृतीवन व स्मारक उभारण्यासाठीच्या निधी देण्याचे शासन निर्णय दि.17/04/2017 मध्ये नमुद केलेल्या निर्देशानुसार या प्रकरणी मा.पालकमंत्री, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने या PMC प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीचे प्राप्त प्रस्तावास मान्यता दिली आहे. त्यानुसार या PMC कडून करारनामा करून घेऊन कार्यादेश देण्यात येईल. तसेच शासन निर्णयात नमुद केले प्रमाणे स्मृतीवन व स्मारक यांचे संकल्पचित्रे / आराखडे अंदाजपत्रकासह तयार करून तदअनुषंगीक पुढील कामे करण्यात येईल. | |

श्री.सय्यद मतीन :महानगरपालिकेची आर्थिक स्थिती आपल्याला माहिती आहे, शासनाने फंड दिला आहे, हि चांगली बाब आहे. परंतु विकासाच्या बाबतीत काय आहे शहरात, पाण्याच्या टाक्या पडत आहे, ठेकेदाराला पैसे मिळत नाही, रोड नाही, रस्ते नाही, हॉस्पीटल नाही, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब होत आहे, विनंती करण्यात येते की, या प्रस्तावास जोरदार विरोध करण्यात येतो, आम्ही त्या माणसाचाही विरोध करतो, ज्याने मोठया गर्वाने म्हटले होते, ज्यांनी बाबरी मस्जिद शहिद केली होती, शिवसैनिक होते तर आम्ही गर्व करतो, याचा जोरदार विरोध करण्यात येतो. आम्ही सभागृहातून वॉकआऊट करतो.

(याचवेळी स.सदस्य मोठमोठयाने बोलत असतात, विषय पत्रिका सभागृहात फाडतात व काही स.सदस्य एकाच वेळी बोलतात)

श्री.रेणुकादास वैद्य :यांचे अशा वागन्याने शहराचे वातावरण दुषित होते, शासकीय कामकाजात अशा प्रकारची भाषा वापरतात, यांचेवर गुन्हे दाखल करण्यात यावे,

(याच वेळी स.सदस्य श्री.शेख मतीन मोठयाने बोलत असतात)

हिंदु हृदयसम्राट माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे असे स्मारक, अतिशय भव्य असे नियोजन या ठिकाणी केलेले आहे, मा.पालकमंत्री, मा.खासदार यांचे या सभागृहात मनापासून अभिनंदन करण्यात येते/यावे, मा.पालकमंत्री साहेबांचे विशेष अभिनंदन करण्यात येते.

(याचवेळी स.सदस्य श्री.शेख मतीन सभागृह सोडुन सभागृहाच्या बाहेर जातात)

या स्मारकासाठी शासनाकडून 10 कोटींची तरतुद मा.पालकमंत्री साहेबांनी केलेली आहे, अशा पध्दतीने कागद फाडून अशा प्रकारे विरोध करून शहराच्या विकासाला व हिंदुत्वाच्या विचाराला कुणी खीळ घालु शकत नाही. मा.सभापती यांना विनंती करण्यात येते की, या प्रस्तावाला आपण मंजूरी द्यावी. जे स्मारक होत आहे, ते येणाऱ्या पिढीला अनेकवर्ष अनेक पिढीला अनेक तरूणांना प्रेरणादायी ठरणारे स्मारक हिंदु हृदयसम्राट मा.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे होत असतांना, अशा प्रकारचा विरोध होत असतांना त्यांचा विरोध नोंदवून घ्या, परंतु हा प्रस्ताव शहराच्या हिताचा आहे,प्रस्ताव मंजूर करावा,अशी विनंती आहे.

श्री.अजीम अहेमद :आमचा विरोध दर्शविण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :यांचा विरोध दर्शवुन प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

श्री.अजीम अहेमद :चारही जणांचा विरोध दर्शविण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :विरोध दर्शवुन प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.
(याच वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलतात)

श्री.राजगौरव वानखेडे :विरोध दर्शवुन प्रस्ताव मंजूर करावा, हा राज्य शासनाने फंड दिलेला आहे. शहराच्या सौदर्यामध्ये भरच पडणार आहे. त्यामुळे वाईट काही नाही, हिंदु ह्दयसम्राट यांना आम्हीही मानतो, प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. एक query आहे. शशी प्रभु असोसिएटस् 5 टक्के प्रोजेक्ट कॉस्ट, आर्कसाठी 4.32 कॉस्ट सर्विस टॅक्स, आता सर्विस टॅक्स संपलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :दुरूस्ती करण्यात यावी.

मा.सभापती :जीएसटी लागू झालेला आहे, दुरूस्ती करण्यात यावी. विषय क्रमांक 21 वर चर्चा केली आहे, चार जणांनी विरोध दर्शविलेला आहे. मा.हिंदु ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे आपल्या शहरामध्ये स्मृतीवन व स्मारक उभारण्यासाठी 5 कोटी रूपयांच्या निधीला मंजूरी आलेली आहे. मा.पालकमंत्री यांनी 10 कोटी मंजूर केलेले आहे.

शहर अभियंता :दुरूस्ती आहे, 20 कोटी रूपये मंजूर केलेले आहे.

मा.सभापती :20 कोटी पैकी 5 कोटी रूपये आलेले आहे, हि अभिमानाची बाब आहे, मा.हिंदु ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्मृतीवन व स्मारक उभे राहत आहे. त्यासाठी मा.पालकमंत्री यांनी सहकार्य केले, शासनाने सहकार्य केले,त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते. यासाठी जी एजन्सी आलेली आहे. शशी प्रभु ॲण्ड आसोसिएटस् यांची सर्वात कमी दराची डीपीआरसाठी निवीदा आलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शशी प्रभु ॲण्ड असोसिएटस् यांचे अभिनंदन करण्यात यावे. सिध्दार्थ उद्यान येथे मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय उभे केले आहे, शहरात अशी एकही देखणी वास्तू नाही, त्याच पध्दतीने हे काम होणार आहे, त्यांनी केलेल्या चांगल्या कामाचे निश्चितपणे गौरव व्हावा,त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.अशी विनंती करण्यात येते.

श्री.अजीम अहेमद :सिध्दार्थ जलतरण तलाव येथे भेट दिली असता कुठल्याही सुविधा उपलब्ध नाही, बसण्यासाठी खुर्च्या नाही.

मा.सभापती : स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे नावाने स्मृतीवन व स्मारक उभारण्याच्या कामाअंतर्गत निविदापूर्व व निविदानंतरची कामे तसेच सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे इत्यादी कामा करीता शशी प्रभु अँड असोसिएटस यांची सर्वात कमी दराच्या प्राप्त झालेल्या निविदेस मान्यता देण्यात येते तसेच मा.पालकमंत्री, औरंगाबाद यांनी यासाठी विशेष सहकार्य केलेले आहे, त्यांचे अभिनंदन करण्यांत येते, सदर प्रस्तावास चार सदस्यांचा विरोध नोंदवून विषयास मान्यता देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने औरंगाबाद येथे स्मृतीवन व स्मारक उभारण्याच्या कामाकरीता शासनाकडून अपेक्षित असलेल्या अनुदान रक्कम रू.5.00 कोटी मधुन प्रस्तावित स्मृतीवन व स्मारक उभारण्याच्या कामाअंतर्गत निविदापूर्व व निविदानंतरची कामे तसेच सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे इत्यादी कामा करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक शशी प्रभु अँड असो. यांची या कामावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन प्रकल्प रक्कमेच्या (Project Cost) 5.00% दराचे निविदेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 22 : (कामगार विभाग)**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपाच्या मालमत्तांच्या संरक्षाणासाठी व सुरक्षा विभागासाठी सुरक्षा रक्षकांची आवश्यकता असल्यामुळे व मनपाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आली होती. या निविदेमध्ये महानगरपालिकेने कोणतेही दर दिलेले नव्हते. त्यामध्ये खालील एजन्सीने निविदा भरणा केलेले आहे.

1. विद्यानंद सुशिक्षीत बेरोजगार संस्था
2. सुंदर कन्स्ट्रक्शन्स
3. विद्युत मंडळ माजी अप्रेंटीस सुशिक्षीत बेरोजगार सेवाभावी संस्था मर्या
4. लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार सेवाभावी संस्था
5. महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स
6. आस्था सुशिक्षित बेरोजगार संस्था मर्या. धुळे
7. युनिक डेल्टा फोर्स, पुणे

उपरोक्त एजन्सीपैकी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या 4 एजन्सीचे व्यावसायीक दर उघडण्यास निविदा समितीने मंजुरी दिल्यानुसार खालील प्रमाणे एजन्सीचे दर प्राप्त झालेले आहेत. उर्वरीत 03 निविदा धारकांना निविदा समितीने अपात्र ठरवले आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | सुरक्षा रक्षकांचे प्राप्त दर |
|---|---|---|
| 1 | सुंदर कन्स्ट्रक्शन्स | 12,333/- |
| **2** | **महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स** | **10,298/-** |
| 3 | आस्था सुशिक्षित बेरोजगार संस्था मर्या. धुळे | 12,712/- |
| 4 | युनिक डेल्टा फोर्स, पुणे | 18,946/- |

तुलनात्मकदृष्ट्या **महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स** यांचे दर सर्वात कमी व त्यांनी त्यांचा दराचा पृथक्करण तक्ता सादर केलेला आहे व संबंधिताने महाराष्ट्र शासन निर्णय बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करुन घेतांना अनुसरावयाच्या बंधनकारक बाबी दि. 19.03.2014 च्या नुसार दर भरणा केलेला आहे. (सोबत :- शासन निर्णय, दर पृथक्करण तक्ता, निविदा समितीचे इतिवृत्त)

संबंधीताने निविदेतील अटी शर्तीचे पालन केले आहे व त्यांचे दर सर्वात कमी असल्यामुळे सुरक्षा रक्षकांचा आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याचे काम महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स या एजन्सीला देण्याबाबत निविदा समितीने शिफारस केलेली आहे. करिता विभागांनी आवश्यकतेनुसार मागणी केल्याप्रमाणे खाजगी सुरक्षा रक्षक मनपाला पुरवठा करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 22.

श्री.अजीम अहेमद :मागील बैठकीत खुलासा मागविण्यात आला होता. माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :सी.ए.मार्फत चौकशी झालेली आहे. 4 लाख 78 हजार पेमेंट अतिरिक्त झालेले होते, ते महानगरपालिकेने वसुल केलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त (म) :विषय क्रमांक 22 सुरक्षा रक्षकांबाबतीतला प्रस्ताव आहे, 11 महिन्यांसाठी हा प्रस्ताव ठेवलेला आहे. सध्या आस्थापनेवर 12 सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत. भविष्यामध्ये 40 सुरक्षा रक्षकांची आवश्यकता आहे. या अनुषंगाने प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा.सभापती :विषय मंजूर करण्यात येतो.

श्री.राजगौरव वानखेडे :तीन ते चार विषय आहेत यामध्ये दुरूस्ती करण्यात यावे की, जो कर्मचारी आहे त्याच्या खात्यावर आरटीजीएस करण्यात यावे, पीएफ कपात बाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालमत्तांच्या संरक्षणासाठी व सुरक्षा विभागासाठी सुरक्षा रक्षकांची आवश्यकता असल्यामुळे, सुरक्षा रक्षक यांची आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 23 : (कामगार विभाग)**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपाच्या विविध विभागासाठी वाहन चालकांची आवश्यकता असल्यामुळे व मनपाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आली होती. या निविदेमध्ये महानगरपालिकेने कोणतेही दर दिलेले नव्हते. त्यामध्ये खालील एजन्सीने निविदा भरणा केलेले आहे.

1. लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार संस्था
2. महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स
3. देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत नाशिक
4. विद्यानंद सुशिक्षीत बेरोजगार संस्था

उपरोक्त एजन्सीपैकी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या 3 एजन्सीचे व्यावसायीक दर उघडण्यास निविदा समितीने मंजुरी दिल्यानुसार खालील प्रमाणे एजन्सीचे दर प्राप्त झालेले आहेत. उर्वरीत 01 निविदा धारकास निविदा समितीने अपात्र ठरवले आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | वाहनचालकाचे प्राप्त दर |
|---|---|---|
| 1 | लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार संस्था | 22,999/- |
| **2** | **महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स** | **16,126/-** |
| 3 | देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत नाशिक | 19,300/- |

तुलनात्मक दृष्ट्या **महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स** यांचे दर सर्वात कमी व त्यांनी त्यांचा दराचा पृथक्करण तक्ता सादर केलेला आहे व संबंधिताने महाराष्ट्र शासन निर्णय बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करुन घेतांना अनुसरावयाच्या बंधनकारक बाबी दि. 19.03.2014 च्या नुसार दर भरणा केलेला आहे. (सोबत :- शासन निर्णय, दर पृथक्करण तक्ता, निविदा समितीचे इतिवृत्त)

संबंधीताने निविदेतील अटी शर्तीचे पालन केले आहे व त्यांचे दर सर्वात कमी असल्यामुळे वाहन चालकांचा आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याचे काम महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स या एजन्सीला देण्याबाबत निविदा समितीने शिफारस केलेली आहे. करिता विभागांनी आवश्यकतेनुसार मागणी केल्याप्रमाणे खाजगी वाहन चालक मनपाला पुरवठा करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 23 मंजूर.

श्रीमती राखी देसरडा :विषय क्रमांक 22, 23, 24 बाबत किती कर्मचारी लागणार आहे, याची सूची दिलेली नाही, कर्मचाऱ्यांचे पेमेंट वेळेवर होत नाही, त्यामुळे चांगले कंत्राटदार यामध्ये भाग घेत नाहीत. भाग न घेतल्या गेल्यामुळे स्पर्धा न वाढल्यामुळे आपले आर्थीक नुकसान होते. पेमेंट वेळेवर केल्यामुळे स्पर्धा वाढेल.

मा.सभापती :स.सदस्या सौ.देसरडा यांनी सूचना केल्याप्रमाणे, महानगरपालिकेची पत खालावणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, सदरील कर्मचाऱ्यांचे व दैनिक

वेतनावरील वर्ग-3,वर्ग-4 कर्मचाऱ्यांचे पेमेंट वेळेवर देण्यांत यावे. विषय क्र.23 ते 25 मंजूर करण्यांत येतात.

श्री.अजीम अहेमद :स्वच्छता निरीक्षक यांना कायम करण्यात येईल का?

उपआयुक्त (म) :याबाबत मा.आयुक्त ठरवतील, सध्या स्वच्छता निरीक्षक यांना तात्पुरत्या स्वरूपात घेतलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मा.आयुक्त यांना विनंती करण्यात येते की, स्वच्छता निरीक्षक यांना न हटवता कार्यवाही करावी. महानगरपालिकेला त्यांनी सेवा दिलेली आहे याचा विचार करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :साफसफाईच्या अनेक अडचणी आहेत, सध्या जे स्वच्छता निरीक्षक आहेत त्यांना कायम तसेच ठेवावे, नविन मनुष्यबळ घेण्यात यावे परंतु जुने एस.आय यांना हटविण्यात येवु नये.

मा.सभापती :प्रशासनाला सूचना देण्यात येतात की, सध्या जे स्वच्छता निरीक्षक आहेत त्यांचा विचार करण्यात यावा त्यांना तसेच कामावर ठेवुन काम करून घेण्यात यावे, याची प्रशासनाने दखल घेण्यात यावी.

श्रीमती राखी देसरडा :प्रत्येक तीन महिन्यानंतर कामाचा आढावा घेण्यात यावा.

मा.सभापती :वार्ड अभियंता यांनी कामाची माहिती देण्यात यावी, तीन महिन्याला प्रशासनाने कामाचा आढावा घेण्यात यावा.

श्रीमती राखी देसरडा :जनतेचा पैसा आहे, त्याचे नुकसान होवु नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या विविध विभागासाठी वाहन चालकांची आवश्यकता असल्यामुळे, वाहन चालक यांची आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 24 : (कामगार विभाग)**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपाच्या विविध विभागासाठी संगणक चालक, स्वयंपाकी व सहाय्यक पर्यटन अधिकारी यांची आवश्यकता असल्यामुळे व मनपाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आली होती. या निविदेमध्ये महानगरपालिकेने कोणतेही दर दिलेले नव्हते. त्यामध्ये खालील एजन्सीने निविदा भरणा केलेले आहे.

1. लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार संस्था
2. महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स
3. देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत नाशिक
4. विद्यानंद सुशिक्षीत बेरोजगार संस्था
5. गॅलॅक्सी मल्टी सर्व्हीसेस
6. सुंदर कन्स्ट्रक्शन्स

उपरोक्त एजन्सीपैकी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या 4 एजन्सीचे व्यावसायीक दर उघडण्यास निविदा समितीने मंजुरी दिल्यानुसार खालील प्रमाणे एजन्सीचे दर प्राप्त झालेले आहेत. उर्वरीत 02 निविदा धारकांना निविदा समितीने अपात्र ठरवले आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | संगणक चालक | सहाय्यक पर्यटन अधिकारी | स्वयंपाकी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार संस्था | 22,999/- | 22,999/- | 22,999/- | 68,997/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स | 16,250/- | 16,150/- | 16,150/- | 48,550/- |
| 3 | देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, नाशिक | 17,950/- | 22,819/- | 17,950/- | 58,719/- |
| 4 | **गॅलॅक्सी मल्टी सर्व्हीसेस** | **16,126/-** | **15,946/-** | **15,946/-** | **48,018/-** |

तुलनात्मक दृष्ट्या **गॅलॅक्सी मल्टी सर्व्हीसेस** यांचे दर सर्वात कमी व त्यांनी त्यांचा दराचा पृथक्करण तक्ता सादर केलेला आहे व संबंधिताने महाराष्ट्र शासन निर्णय बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करुन घेतांना अनुसरावयाच्या बंधनकारक बाबी दि. 19.03.2014 च्या नुसार दर भरणा केलेला आहे. (सोबत :- शासन निर्णय, दर पृथक्करण तक्ता, निविदा समितीचे इतिवृत्त)

संबंधीताने निविदेतील अटी शर्तीचे पालन केले आहे व त्यांचे दर सर्वात कमी असल्यामुळे संगणक चालक, सहाय्यक पर्यटन अधिकारी व स्वयंपाकी यांची आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याचे काम गॅलॅक्सी मल्टी सर्व्हीसेस या एजन्सीला देण्याबाबत निविदा समितीने शिफारस केलेली आहे. करिता विभागांनी आवश्यकतेनुसार मागणी केल्याप्रमाणे खाजगी संगणक चालक, सहाय्यक पर्यटन अधिकारी व स्वयंपाकी यांचा मनपाला पुरवठा करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या विविध विभागासाठी संगणक चालक, स्वयंपाकी व सहाय्यक पर्यटन अधिकारी यांची आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची गॅलॅक्सी मल्टी सर्व्हीसेस यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 25 : (कामगार विभाग)**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपाच्या विविध विभागासाठी तांत्रिक कुशल कर्मचारी यांची आवश्यकता असल्यामुळे व मनपाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आली होती. या निविदेमध्ये महानगरपालिकेने कोणतेही दर दिलेले नव्हते. त्यामध्ये खालील एजन्सीने निविदा भरणा केलेले आहे.

1. लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार संस्था
2. महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स
3. विद्यानंद सुशिक्षीत बेरोजगार संस्था
4. सुंदर कन्स्ट्रक्शन्स
5. आस्था सुशिक्षित बेरोजगार संस्था मर्या. धुळे

उपरोक्त एजन्सीपैकी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या 03 एजन्सीचे व्यावसायीक दर उघडण्यास निविदा समितीने मंजुरी दिल्यानुसार खालील प्रमाणे एजन्सीचे दर प्राप्त झालेले आहेत. उर्वरीत 02 निविदा धारकांना निविदा समितीने अपात्र ठरवले आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | तांत्रिक कुशल कर्मचारी |
|---|---|---|
| 1 | लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार संस्था | 5,46,063/- |
| **2** | **महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स** | **3,85,356/-** |
| 3 | आस्था सुशिक्षीत बेरोजगार संस्था मर्या. धुळे | 5,49,591/- |

तुलनात्मक दृष्ट्या **महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स** यांचे दर सर्वात कमी व त्यांनी त्यांचा दराचा पृथक्करण तक्ता सादर केलेला आहे व संबंधिताने महाराष्ट्र शासन निर्णय बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करुन घेतांना अनुसरावयाच्या बंधनकारक बाबी दि. 19.03.2014 च्या नुसार दर भरणा केलेला आहे. (सोबत :- शासन निर्णय, दर पृथक्करण तक्ता, निविदा समितीचे इतिवृत्त)

संबंधीताने निविदेतील अटी शर्तीचे पालन केले आहे व त्यांचे दर सर्वात कमी असल्यामुळे तांत्रिक कुशल कर्मचारी यांची आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याचे काम महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स या एजन्सीला देण्याबाबत निविदा समितीने शिफारस केलेली आहे. करिता विभागांनी आवश्यकतेनुसार मागणी केल्याप्रमाणे खाजगी तांत्रिक कुशल कर्मचारी यांचा मनपाला पुरवठा करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या विविध विभागासाठी तांत्रिक कुशल कर्मचारी यांची आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 26 : (उप अभि. झोन क्र.05, सिडको)**

विषय : वार्ड क्र.37 अंतर्गत सावित्रीनगर ते पटेलनगर, हिनानगर ते सादत मस्जिदपर्यंत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. या कामाचे ठेकेदार श्री.रामेश्वर गजानन कराड यांचेकडून 4.99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.47,49,497.90/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्रमांक /Tender ID-2017-AMCA-195533-1

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.37 अंतर्गत सावित्रीनगर ते पटेलनगर, हिनानगर ते सादत मस्जिदपर्यंत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दि.28/12/2016 विषय क्र.112 अं.प. र.रू.49,98,945/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.49,98,945/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 11/04/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 25/04/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 1 निविदा |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नांव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त** |
|---|---|---|---|
| 1 | श्री.रामेश्वर गजानन कराड | 47,49,497.90/- | 4.99% कमी |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | भांडवली कामे व जलनि:सारण |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.रामेश्वर गजानन कराड यांचेकडून 4.99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.47,49,497.90/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : ऐनवळेचे विषय 26 व 27 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.37 अंतर्गत सावित्रीनगर ते पटेलनगर, हिनानगर ते सादत मस्जिदपर्यंत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.रामेश्वर गजानन कराड यांचेकडून 4.99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.47,49,497.90/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 27 : (उपअभियंता झोन क्र.05 सिडको)**

विषय : वार्ड क्र.64 गुलमोहर कॉलनी अंतर्गत एन-5 भागातील अरूणोदय कॉलनी व सह्याद्रीनगर येथील रस्त्यांचे ट्रि-मिक्स कॉंक्रीटीकरण करणे. या कामाचे ठेकेदार मे.पुजा कन्स्ट्रक्शन यांचेकडून 1.99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.28,65,402.71/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्रमांक / Tender ID-2016-AMCA-180933-1

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उप अभियंता झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.64, गुलमोहर कॉलनी अंतर्गत एन-5 भागातील अरूणोदय कॉलनी व सहयाद्रीनगर येथील रस्त्यांचे ट्रि-मिक्स कॉंक्रीटीकरण करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दि.11/11/2016 विषय क्र.58 अं.प. र.रू.29,99,600/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.29,23,581/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.01/02/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.13/02/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 निविदा |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | पुजा कन्स्ट्रक्शन | 28,65,402.71/- | 1.99% कमी |
| 2 | पी.एस. टेंभूर्णीकर | 28,97,269.75/- | 0.90% कमी |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नवीन काँक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.पुजा कन्स्ट्रक्शन यांचेकडून 1.99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.28,65,402.71/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.64 गुलमोहर कॉलनी अंतर्गत एन-5 भागातील अरूणोदय कॉलनी व सह्याद्रीनगर येथील रस्त्यांचे ट्रि-मिक्स काँक्रीटीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.पुजा कन्स्ट्रक्शन यांचेकडून 1.99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.28,65,402.71/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.सभापती :महानगरपालिकेत नव्याने आलेले अतिरिक्त आयुक्त यांचे अभिनंदन करण्यात येते, सहाय्यक आयुक्त म्हणुन आलेले आहे. त्याची सभागृहास परिचय करून द्यावा.

सहाय्यक आयुक्त :(श्री.दिलीप लक्ष्मण खाटेकर यांनी सभागृहास आपला परिचय करून दिला)

मा.सभापती :मा.सर्वसाधारण सभेने बजेट अजुन मंजूर केलेले नाही, मा.स्थायी समितीने मंजूर केलेल्या बजेटबुक नुसार सर्व कामाचे अंदाजपत्रक तयार करा, टेंडर कॉल करण्यात यावे, सर्वांनी या सभेला सहकार्य केले त्या सर्वाचे धन्यवाद.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद